## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
## अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल, औरंगाबाद

### जाहिरात क्र. १/२०१६ अंतर्गत 'निम्नस्तर लिपिक (लेखा)' पदावर नेमणूक करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी / प्रतिक्षा यादी

महापारेषण कंपनीच्या औरंगाबाद परिमंडल कार्यालयाने प्रसारित केलेल्या जाहिरात क्र.०१/२०१६ अन्वये निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांसाठी दि. ०३.०६.२०१६ रोजी घेण्यात आलेली ऑनलाईन लेखी परिक्षा रद्द करण्याबाबत व सदर पदाच्या ऑनलाईन परीक्षेकरीता उपस्थित असलेल्या उमेदवारांची पुनःपरीक्षा घेण्याबाबत दि. ०२.०९.२०१६ व दि.१७.११.२०१६ रोजीच्या सुचनापत्राद्वारे जाहीर करण्यात आले होते. त्याअनुषंगाने दि. ०१.१२.२०१६ रोजी घेण्यात आलेल्या पुनःपरीक्षेत (ऑनलाईन) उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे तसेच जाहिरातीत देण्यात आलेल्या निम्नस्तर लिपिक (लेखा) पदाची उपलब्ध संख्या व सामाजिक आरक्षण इत्यादी बाबी विचारात घेऊन तात्पुरते पात्र ठरलेल्या उमेदवारांची निम्नस्तर लिपिक (लेखा) या पदाची तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी ही खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

१. उमेदवारांची तात्पुरती निवड ही उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेली जात व इतर माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून याबाबतची मूळ प्रमाणपत्रांची/ कागदपत्रांची पडताळणीवेळी तपासणी करण्यात येईल.

२. तात्पुरती निवड करण्यात आलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, तसेच म.रा.वि.मंडळ / महापारेषण कंपनीत यशस्वीरित्या Accountancy & Auditing / Taxation या व्यवसायात शिकाऊ उमेदवारी पूर्ण केल्याबाबतचे सर्व मूळ प्रमाणपत्रे, कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

३. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक मिळण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ही निवड यादी पुर्णतः जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आली आहे.

४. निम्नस्तर लिपिक (लेखा) पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करित नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटींचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांजवळ असलेली पात्रता व सर्व आवश्यक कागदपत्रे ही जाहिरातीस अनुसरुन निम्नस्तर लिपिक (लेखा) या पदाकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण / प्राप्त केलेले असणे व वैध असणे आवश्यक आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांनी आवश्यक पात्रता व कागदपत्रे ही जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण / प्राप्त केलेली नसतील व वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल महापारेषण कंपनी तर्फे घेण्यात येणार नाही.

६. निम्नस्तर लिपिक (लेखा) या पदाच्या तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवार हे कागदपत्र पडताळणीत अपात्र आढळून आल्यास प्रतिक्षा यादी कार्यान्वीत करण्यात येऊन त्या यादीतील उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादीतील उमेदवार सुध्दा पात्रता व कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरल्यास त्याखालील गुणवत्ताधारक उमेदवारांची स्वतंत्र निवड / प्रतिक्षा यादी लावण्याचे आधिकार महापारेषण कंपनी राखून ठेवत आहे.

७. तदर्थ म.रा.वि.मंडळ/महापारेषण कंपनीत यशस्वीरित्या Accountacncy and Auditing / Taxation या व्यवसायात शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पुर्ण केलेल्या सर्व अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना त्यांनी ऑनलाईन परिक्षेत मिळविलेल्या गुणांच्या १०टक्के अधिक गुण त्यांच्या लेखी परिक्षेतील गुणांमध्ये मिळवून येणा-या गुणांच्या आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात आली आहे. त्यासाठी उमेदवाराने Accountacncy and Auditing / Taxation या व्यवसायात शिकाऊ उमेदवारी पूर्ण केल्याबाबतचे तदर्थ म.रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

८. निम्नस्तर लिपिक (लेखा) या पदाची तात्पुरती निवड/ प्रतिक्षा यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामूळे झालेल्या चुका सुधारीत करून योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार महापारेषण कंपनीने राखून ठेवलेला आहे.

९. निम्नस्तर लिपिक (लेखा) या पदाची तात्पुरती निवड/प्रतिक्षा सूची ही निकाल घोषीत केल्याच्या तारखेपासून १ वर्षाकरीता वैध राहील.

१०. अयशस्वी उमेदवारांनी व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महापारेषण कंपनीकडे करू नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्रव्यवहाराची महापारेषण कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

११.निम्नस्तर लिपिक (लेखा) या पदाच्या या तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा यादीत समावेश असलेल्या उमेदवारांनी प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीची पुढील प्रक्रिया जाणून घेण्याकरिता वेळोवेळी महापारेषण कंपनीच्या www.mahatransco.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

१२.निम्नस्तर लिपिक (लेखा) या पदाची तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी खालीलप्रमाणे:-

| **Sr. No.** | **Roll No.** | **Name of the Candidate** | **Category** | **Remarks** |
|---|---|---|---|---|
| | | **Select List** | | |
| 01 | 168148683 | PARMESHWAR MANIKRAO GHUNGARD | OPEN | |
| 02 | 145129594 | SHIVAJI MADHAVRAO BABRE | OPEN | |
| 03 | 163146916 | RAVINDRA APPASAHEB KADAM | OPEN | |
| 04 | 165147461 | DEEPAK LAHU WANKHEDE | SC | |
| 05 | 155134036 | PRATIK SURESH KUPATKAR | OBC | |
| 06 | 163146971 | SATWA KASHINATH DESHMUKHE | ST | |
| 07 | 171152743 | JITENDRA ARVIND THAKUR | ST | |
| 08 | 168148646 | NILESH SITARAM CHAUDHARI | ST | |
| | | **Wait List** | | |
| 01 | 163147026 | UJJWAL VISHNU PAWAR | OPEN | |
| 02 | 172154513 | GAJENDRA GIRJARAM GOMLADU | OBC | |
| 03 | 165147403 | ANIL BABURAO ADHAVE | SC | |
| 04 | 147130122 | BALAJI GANGADHAR MUPADE | ST | |

- **उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षेत प्राप्त केलेले गुण पाहण्यासाठी येथे क्लिक करावे.**

मुख्य अभियंता

दिनांक:- ०६.१२.२०१६ — अउदा प्रकल्प तथा संवसु परिमंडल, औरंगाबाद

*************